NAAC Accredited-2015
B Grade (CGPA 2.62)

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# कौशल्य विकास केंद्र

## संलग्निकरणाचे नियम

१. सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित कोणत्याही महाविद्यालयामध्ये व भारत सरकारच्या धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे किंवा कंपनी ॲक्ट नुसार प्रायव्हेट लिमिटेड कं, बाँबे नर्सिंग ॲक्ट (Bombay Nursing Act) मध्ये नोंदणीकृत असलेल्या महाविद्यालय/संस्था यांना कौशल्य विकास केंद्राची संलग्निता घेऊन कोर्स सुरू करता येतील.

२. संलग्निकरण घेवू इच्छिणाऱ्या संस्थेचा/महाविद्यालयाचा नोंदणीचा कालावधी किमान दोन वर्षे पूर्ण केलेला असावा.

३. संस्था/महाविद्यालयाचे मागील २ वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

४. संस्थेने अथवा महाविद्यालयाने कोर्स सुरू करण्यासंबंधीचा प्रस्ताव तीन प्रतीत सादर करावा.

५. जागा ही संस्थेच्या/महाविद्यालयाच्या मालकीची असल्यास जागेचा सात बारा उतारा जोडणे आवश्यक आहे. जागा भाडे तत्त्वावर असल्यास भाडे करार पत्र व जागा मालकाचे संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे.

६. कौशल्य विकास केंद्रचे सर्व अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातच चालवणे बंधनकारक राहील.

७. कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा संस्थेचा ठराव प्रस्तावासोबत मागणी केलेल्या अभ्यासक्रमानुसार जागा, उपकरणे, ग्रंथालय सुविधा, प्रयोगशाळा, कार्यशाळा (Work shop), भौतिक सुविधा मुबलक प्रमाणात असल्याचे स्पष्ट व सविस्तर माहिती देणे बंधनकारक राहील.

८. सर्व अभ्यासक्रमासाठी संलग्निकरणाची मर्यादा ३ वर्षे इतकी असणार आहे. प्रत्येक पॅरामेडिकल अभ्यासक्रमासाठी रू. १५,०००/- व इतर अभ्यासक्रमासाठी रू. ५,०००/- संलग्निकरण शुल्क असेल.

९. संलग्निकरणाच्या नूतनीकरणासाठी गतवर्षीच्या मान्यता प्राप्त संस्था/महाविद्यालयांनी संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाचा प्रस्ताव सादर करताना सोबत पॅरामेडिकल या अभ्यासक्रमासाठी रू. ५,०००/- व इतर अभ्यासक्रमासाठी नूतनीकरण शुल्क रू. ३,०००/- भरावे. तसेच संलग्नीकरण व नुतनीकरणाच्या नियमीत शुल्कानंतर विलंब शुल्क व अतिविलंब शुल्क विद्यापीठाच्या नियमानुसार जमा करावे लागेल.

१०. ज्या संस्था/महाविद्यालयांना अटी पूर्ततेच्या आधीन राहून संलग्निकरण देण्याची शिफारस केली आहे अशा संस्थानी १ महिन्याच्या आत अटीपूर्तता अहवाल सादर करून संलग्नता करून घेणे बंधनकारक राहील.

११. एकदा नामंजूर झालेल्या प्रस्तावाचा फेरविचार केला जाणार नाही. नव्याने विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राच्या नियमावली नुसार नवीन प्रस्ताव पुढील वर्षी सादर करण्याची त्यांना मुभा राहील.

१२. संलग्नित महाविद्यालय/संस्था मध्ये कौशल्य विकास केंद्राच्या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याच्या एकूण शुल्कापैकी विद्यापीठाचा निर्धारित वाटा २५% इतका राहील. ही निर्धारित २५% शुल्काची रक्कम अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतर एका महिन्यात भरणे सक्तीचे आहे. या व्यतिरिक्त परीक्षा शुल्क वेगळे राहील.

१३. ठरवून दिलेल्या अभ्यासक्रम शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क घेता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास सदर महाविद्यालय/संस्थाची संलग्नता संपुष्टात येईल

१४. कौशल्य विकास केंद्राशी सामंजस्य करार (MOU) करतेवेळी विद्यापीठाचा किमान वाटा २५% राहील परंतू सामंजस्य करार (MOU) करताना अभ्यासक्रमाचे स्वरूप, शुल्क व गरज पाहून यामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरू यांना असतील.

१५. कौशल्य विकास केंद्रा मध्ये एखादा नवीन अभ्यासक्रम सुरू करीत असताना कौशल्य विकास केंद्र नियमाच्या आधीन राहून नवीन अभ्यासक्रम सुरू करता येतील.

१६. महाविद्यालय/संस्था संलग्निकरण, नुतनीकरण, विद्यार्थी प्रवेश व इतर अनुषंगीक बाबीचे संपूर्ण आधीकार विद्यापीठ प्रशासनाकडे अंतीम राहतील.

१७. उपरोक्त सर्व नियमामध्ये वेळप्रसंगी व गरजेनुसार बदल करण्याचे आधीकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील.